# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- आज विजयादशमी–सरस्वती पूजन, शस्त्रपूजन आणि रावणदहनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन
- ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरच्या दीक्षाभूमीवर हजारो बौध्द अनुयायी दाखल
- नवी मुंबई विमानतळाची वायूदलाकडून चाचणी यशस्वी– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वैमानिकांचा सत्कार
- नाशिकच्या देवळाली छावणी तोफ गोळा स्फोट प्रकरणी सैन्यदलाचे कोर्ट ऑफ इन्क्वायरीचे आदेश

  आणि
- भारत–बांगलादेश टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेत आज तिसरा आणि अखेरचा सामना

****

दसरा अर्थात विजयादशमीचा सोहळा आज साजरा होत आहे. यानिमित्तानं सर्वत्र सरस्वती पूजन, शस्त्रपूजन आणि रावणदहनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं. घटस्थापनेनं प्रारंभ झालेल्या नवरात्रोत्सवाची आज घटोत्थापनेनं सांगता होत आहे. काल ठिकठिकाणच्या देवी मंदिरांमध्ये होमहवन आदी धार्मिक विधी पार पडले.

किल्ले प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आराध्य भवानी मातेची, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते अभिषेक तसंच आरती करण्यात आली. यावेळी खासदार उदयनराजे भोसले यांनी यादव यांचा शिवमुद्रा आणि तलवार देऊन सत्कार केला.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी मंदिरात जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते सपत्निक शतचंडी यज्ञाची पूर्णाहुती करण्यात आली. दुर्गा सप्तशती, तुळजा सहस्त्रनाम, भवानी सहस्त्रनाम आणि नवग्रहांचं हवन करण्यात आलं.

****

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई इथल्या श्री योगेश्वरी देवीच्या मंदिरात बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी सपत्निक होम हवन करून पूर्णाहुती दिली. आज विजयादशमीच्या मुहूर्तावर दुपारी एक वाजता श्री योगेश्वरी देवीच्या पालखीची मिरवणूक, सीमोल्लंघनासाठी मंदिरातून निघणार आहे.

****

माहूर इथं रेणुकादेवीच्या दर्शनासाठी नागरिक मोठ्या संख्येनं गर्दी करत आहेत. राज्याच्या कानाकोपऱ्यासह परराज्यातून येणाऱ्या भाविकांसाठी मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीनं सुरक्षेसह विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथं कर्णपुरा परिसरात भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. मंदिर परिसरात भरलेल्या जत्रेला भेट देण्याऱ्या महिला आणि मुलांची संख्या लक्षणीय आहे.

****

दसऱ्यानिमित्त आज बीड जिल्ह्यात २ ठिकाणी मेळावे होत आहेत. पाटोदा तालुक्यातल्या सावरगांव इथे भाजपच्या राष्ट्रीय सचिव आमदार पंकजा मुंडे यांचा मेळावा होत असून, कृषीमंत्री धनंजय मुंडे यावेळी उपस्थित राहणार आहेत. श्री क्षेत्र नारायण गडावर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत दसरा मेळावा होणार आहे.

****

नवरात्रोत्सवानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित दीपश्री संगीत महोत्सवाचा काल समारोप झाला. देगलुर इथले युवा बासरीवादक अनहद वारसी आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायिका विदुषी शुभदा पराडकर यांचं यावेळी सादरीकरण झालं, या महोत्सवाचं हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे.

****

नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी सोहळा सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांच्या उपस्थितीत सध्या साजरा होत आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था–इस्रोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के राधाकृष्णन या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित आहेत. या सोहळ्यापूर्वी आज सकाळी स्वयंसेवकांचं पथसंचलन झालं, नागरिकांनी या संचलनाचं स्वागत केलं.

****

नागपूरच्या दीक्षाभूमीवर आज ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर दीक्षाभूमीवर कालपासूनच हजारो बौध्द अनुयायी दाखल झाले आहेत. बौध्द अनुयायांना प्रशासनाकडून विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, आर्य भदंत सुरई ससाई यांच्या उपस्थितीत अनेक उपासक आणि श्रामणेर यांना धम्मदीक्षा देण्यात येत आहे. आर्य भदंत सुरई ससाई यांच्या हस्ते काल पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर इथंही बुद्धलेणी परिसरात या निमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

नवी मुंबई विमानतळावर चार टर्मिनलची उभारणी होणार असून या विमानतळावरून वर्षाला ९ कोटी लोक प्रवास करतील, तसंच २६ लाख टन कार्गो वाहतूक होईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हवाई पट्टीवर काल वायू दलाच्या *C–295* विमानाचं यशस्वी अवतरण झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. ते म्हणाले…

***हे एअर पोर्ट जे आहे, हे देशातलं नंबर एकच एअरपोर्ट आहे. यामध्ये वर्षाला नऊ कोटी लोक प्रवास करतील. आणि जवळपास टू पॉईंट सिक्स दशलक्ष टन कार्गोमध्ये वाहतूक होईल. याच्या दोन एअरस्ट्रीप पॅरलल चलणार आहेत. आणि हे देशातलं सर्वात मोठं एअरपोर्ट ठरेल.***

सुखोई–३० या लढाऊ विमानानेही यावेळी फ्लायपास्ट अर्थात हवाईपरेड केली. या विमानांना वॉटर कॅनन अर्थात जलतोफांची सलामी देण्यात आली. या विमानाच्या वैमानिकांचा मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यावेळी उपस्थित होते.

****

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात प्रशिक्षणासाठी राज्य सरकार आणि राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्यात काल सामंजस्य करार करण्यात आला. या करारामध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना, राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातल्या संशोधन आणि विकास केंद्र यांच्यासाठी थ्री डी प्रिंटिंग आणि सहाय्यक तंत्रज्ञानाचा समावेश आहे.

****

राज्यात विविध ठिकाणच्या रस्त्यांच्या विकासकामांचं भूमिपूजन काल झालं. यामध्ये २४ जिल्हे आणि ४४ विधानसभा मतदारसंघात १२ हजार ७६८ कोटी रुपये किंमतीच्या १ हजार ४८० किलो मीटर लांबीच्या दु–पदरी सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्यांचं भूमिपूजन झालं.

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात निळकंठेश्वर तसंच महापुरुष मार्ग या ६८६ कोटी रुपये खर्चाच्या दोन नवीन राज्य महामार्गांचा आणि धाराशिव तालुक्यातील तेर ते तुळजापूर दरम्यानच्या ४२ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामांचाही यात समावेश आहे.

****

टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ उद्योजक नोएल टाटा यांची एकमतानं निवड झाली आहे. दिवंगत रतन टाटा यांचे सावत्र बंधू असलेले नोएल टाटा सध्या टाटा स्टील आणि व्होल्टाससह इतरही कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत.

****

बँकांसह आर्थिक व्यवहार सेवा प्रदात्या कंपन्यांनी डिजिटल व्यवहारांमध्ये दिव्यांगांच्या सुविधेकडे लक्ष देण्याचं आवाहन रिजर्व्ह बँकेनं केलं आहे. पॉईंट ऑफ सेल यंत्रांमध्ये दिव्यांग अनुकूल बदल करावेत, तसंच यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम सादर करण्याची सूचनाही रिजर्व्ह बँकेनं केली आहे.

****

चालू आर्थिक वर्षात प्राप्तीकर विभागाला आतापर्यंत १३ लाख ५७ हजार कोटी रुपये महसूल प्राप्त झाला आहे. यामध्ये ७ लाख कोटी रुपये वैयक्तिक प्राप्तिकर आणि ६ लाख कोटी रुपये औद्योगिक प्राप्तीकराचा समावेश आहे. कालपर्यंत प्राप्तीकरखात्यानं सुमारे दोन लाख ३१ हजार कोटी रुपयांचा परतावा दिला आहे.

****

नाशिक जवळील देवळाली छावणीत तोफ गोळा स्फोट प्रकरणी सैन्यदलानं कोर्ट ऑफ इन्क्वायरीचे आदेश दिले आहेत. काल सकाळी झालेल्या या स्फोटात दोन अग्निवीरांचा मृत्यू झाला. तोफ चालवण्याचं प्रशिक्षण घेत असताना हा स्फोट झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या दुर्घटनेत अन्य एक अग्निवीर जखमी असून त्याच्यावर लष्कराच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

****

भारत आणि बांगलादेश टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा आणि अखेरचा सामना आज हैदराबाद इथं खेळवला जात आहे. मालिकेत भारतानं दोन शून्य अशी विजयी आघाडी घेतली आहे.

आयसीसी महिला टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची लढत उद्या ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. अंतिम फेरीतील चार संघात स्थान मिळवण्यासाठी भारतीय संघाला हा सामना जिंकणं आवश्यक आहे.

****

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी काल नांदेडच्या शासकीय विश्रामगृहात विविध क्षेत्रातील मान्यवरांची भेट घेऊन संवाद साधला, त्यापूर्वी नांदेड विमानतळावर खासदार अशोक चव्हाण, विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि अन्य मान्यवरांनी राज्यपालांचं स्वागत केलं.

दरम्यान, राज्यपाल परवा १४ तारखेला लातूर दौऱ्यावर येत आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या छत्रपती शाहू महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य उल्हास शिंदे यांचं काल हृदयविकारानं निधन झालं. ते ५५ वर्षांचे होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे ते माजी अधिष्ठाता होते. धाराशिव जिल्ह्यात उमरगा इथं उल्हास शिंदे यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

****

नांदेड जिल्ह्यात विशेष पथकातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी वाळूमाफियांवर कारवाई न करता त्यांच्याकडून वसुली करत असल्याची बाब उघडकीस आली, याप्रकरणी एक पोलीस उपनिरीक्षक आणि चार अंमलदाराना निलंबित करण्याचे आदेश नांदेड पोलीस परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिले आहेत.

****